# प्रेसनोट दि.१८/०७/२०१९
## पदाधिकारी प्राचार्य व उच्च माध्यमिक विद्यालयाचे विद्यार्थी एकुण ६० ते ७० यांचे समवेत विद्यार्थी यांची मिटींग
## कोंढवा पो स्टे पुणे शहर

दि.१८/०७/२०१९ रोजी ०९.३० ते ११.०० वा. चे दरम्यान हिलग्रिन्स हायस्कूल,उंड्री पुणे येथील स्कूल मधील पदाधिकारी प्राचार्य व उच्च माध्यमिक विद्यालयाचे विद्यार्थी एकुण ६० ते ७० यांचे समवेत विद्यार्थी यांची मिटींग मा.वपोनि कोढवां पोलीस ठाणे पुणे यांचे अधिपत्या खाली पोउप निरीक्षक निबांळकर,पो.ना.६७२५ माने व पो.ना.६४५२पांडुळे कोढंवा पोलीस ठाण्णे पुणे यांनी सदर स्कूल मध्ये स्कूलचे कार्यालयात घेतली त्यामध्ये विद्यार्थ्यांना,सायबर क्राईम वरून होणारे गुन्हे कसे घडले जातात त्या करीता आपण काय केले पाहीजे व काय करू नये व याबाबत आपले नातेवाईक आणी मित्र मैत्रिणी यांना देखील माहीती देणे विषयी,तसेच वाहतुक नियमनाचे उल्लंघन्न का करू नयेत व त्याचे दुष्परीणाम या विषयी माहीती दिली.त्याचप्रमाणे महिला बाबत गुड टच,बॅड टच बाबत,बस ड्रायव्हर याने तंबाखु खाणे,दारू पिणे,गुटखा खाणे असे कृत्य केलेस त्याची माहिती पालक व शालेय शिक्षक यांना देणे.तसेच शाळा चालक व्यवस्थापक यांना त्यांचे स्कूल मध्ये किंवा व्हॅन मध्ये व बसमध्ये विद्यार्थीनी असतात त्या वाहनास जी पी एस सिस्टीम लावणे बाबत,तसेच स्कुल आवारा मध्ये आणी स्कूलचे बाहेरील बाजुचा भाग केंद्रीत करता येईल या प्रमाणे सी सी टि व्हि कॅमेरे बसविणे,तसेच सोशल मिडीयाचा योग्य प्रकारे वापर करणे बाबत.चर्चा केली.स्कूल मधील ड्रायव्हार यांचे व्हेरीफिकेशन  करून घेणे आवश्यक आहे.स्कूल बस मध्ये एक महिला कर्मचारी यांची नेमणुक करावी.शालेश विद्यार्थ्या मध्ये रॅंगीग चे प्राकर घडतात याबाबत सी सी टि व्हि व्दारे नियत्रंण ठेवणेस मदत हाईल व असे प्रकार टाळता येईल,खाजगी बसेस बाबत स्कूल चालक व बस मालक यांचेत करारनामा करून घ्यावा.संशयीत व्यक्ती आवारामध्ये फिरताना आढळून आलेस पोलीसांना तात्काळ कळविणे.या बाबत प्रबोधन केले.यामध्ये विद्यार्थी व विद्यार्थीनीनी पोलीसांनी घेतलेल्या मिटींग करीता उस्त्तूर्फपणे साद दिली आहे.तसेच पोलीसांनी केलेल्या उपरोक्त विषयावरील  प्रबोधना मुळे स्कूल मधील प्राचार्य,स्कुलचे पदाधिकारी व विद्यार्थी आणी विद्यार्थीनीनी पोलीसाचे आभार मानले आहेत.

**(अनिल पाटील)**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
कोंढवा पोलीस ठाणे पुणे शहर